# मुंबई विद्यापीठ

## विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार संघाकरीता तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.

## जाहीर प्रकटन

### क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/१३४९.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(न)[28(2)(t)] अन्वये निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधरांच्या तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जाच्या यादी (कारणासहीत) **गुरूवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४** रोजी विद्यापीठाच्या **https://mu.ac.in** या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा **https://mu.eduapp.co.in** या संकेतस्थळावर **Electoral Roll** या सदराखाली (Tab) प्रसिध्द केल्या आहेत. तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात आलेली आहे.

तसेच मतदारांने आपला अर्ज कोणत्या यादीमध्ये आहे हे शोधण्यासाठी **“Search Registered Graduate Applications”** या **Tab** वर **Click** करावे, त्यामध्ये मतदाराने त्यांचा मोबाईल नंबर किंवा अर्ज क्रमांक टाकून आपला अर्ज पात्र किंवा अपात्र यादीमध्ये आहे याची माहिती घ्यावी.

सदर तात्पुरती मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी **गुरूवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ ते सोमवार, दिनांक ०४ मार्च, २०२४** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

ऑनलाईन पध्दती व्यतीरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने **(Whatsapp, E-mail & Letter hard copy)** सदर आक्षेप किंवा सुचना नोंदविल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या **https://mu.ac.in** या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा **https://mu.eduapp.co.in** या संकेतस्थळावर आपल्या संबंधित प्राधिकारणाच्या login मध्ये जाऊन आपल्या अर्जाची स्थिती पाहता येईल.

२. यासंदर्भात तात्पुरत्या मतदार याद्यांमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर आपल्या **Login** मध्ये उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

स्वाक्षरीत/-<br>(डॉ. बळीराम गायकवाड)<br>प्रभारी कुलसचिव तथा<br>निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : **२८ फेब्रुवारी, २०२४**<br>ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.